# THE BOMBAY LAND TENURES ABOLITION (RECOVERY OF RECORDS) ACT, 1953

(Bom. L of 1953)

## मुंबई भू-सत्ता प्रकार नाहीसे करण्याबाबत (कागदपत्र परत मिळविण्यासंबंधीं) अधिनियम, १९५३.

### अनुक्रमणिका

प्रस्ताविक


कलमें — पान

१. लघु संज्ञा ... ११०९

२. व्याख्या ... ११०९

३. धारण करणाऱ्यानें जमिनीबाबतचीं कागदपत्रें राज्य सरकारच्या स्वाधीन करणें ... १११०

४. झडत्या घेण्याचा अधिकार ... १११०

५. अपराध व शिक्षा ... १११०

६. नियम ... १११०

अनुसूचि.

## सन १९५३ चा मुंबई अधिनियम ५०*

[मुंबई भू-सत्ता प्रकार नाहीसे करण्याबाबत (कागदपत्र परत मिळविण्यासंबंधी) अधिनियम, १९५३]

[७ ऑक्टोबर १९५३]

या अधिनियमांत पुढील आदेशान्वयें अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यांत आल्या आहेत :—

सन १९५४ चा मुंबई अधिनियम ५२

**मुंबई राज्यांतील विशिष्ट अधिनियमावरून रद्द करण्यांत आलेल्या सत्ता प्रकारानें धारण केलेल्या जमिनी किंवा गांवें धारण करणाऱ्यांनीं ठेवलेलीं कागदपत्रें परत मिळविण्यासंबंधी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबई राज्यांतील विशिष्ट अधिनियमावरून रद्द करण्यांत आलेल्या सत्ता प्रकारानें धारण केलेल्या जमिनी किंवा गांवें धारण करणाऱ्यांनीं ठेवलेलीं कागदपत्रें (रेकॉर्ड) परत मिळविण्यासंबंधी तरतूद करणें इष्ट आहे ; त्याअर्थी याअन्वयें पुढील प्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. हया अधिनियमास मुंबई भू-सत्ता प्रकार नाहीसा करण्याबाबत (कागदपत्रें परत मिळविण्यासंबंधीं) अधिनियम, १९५३ असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास, हया अधिनियमांत,— व्याख्या.

(१) "धारण करणारा" या संज्ञेचा अर्थ, संबंधित भू-सत्ता प्रकार नाहीसा करण्याबाबतच्या अधिनियमांत पुढील संज्ञांना अनुक्रमें ज्या व्याख्या दिलेल्या असतील किंवा त्यांचा उल्लेख केलेला असेल त्याप्रमाणें :—

(अ) तालुकदार,
(ब) वतनदार,
(क) वजिफदार,
(ड) भू-संपत्तिधारक,
(इ) मुळगिरासिया,
(फ) आंकडेदार
(ग) कौलधारण करणारा,
(ह) इनामदार, किंवा
(आय) मतादार,

असा समजावा ; आणि तींत त्याचे वारस, अभिहस्तांकित केलेले इसम व वैध प्रतिनिधि तसेंच त्या त्या वेळीं अशा धारण करणाऱ्याच्या वतीनें कोणतीहि जमिनीसंबंधीचीं कागदपत्रें ज्याच्या ताब्यांत आहेत असा इसम, यांचा समावेश होतो ;

(२) "भू-सत्ता प्रकार नाहीसा करण्याबाबत अधिनियम" या संज्ञेचा अर्थ, हया अधिनियमास जोडलेल्या परिशिष्टांत निर्दिष्ट केलेला अधिनियम असा समजावा ;

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

(३) "जमिनीबाबतचें कागदपत्र" या संज्ञेचा अर्थ, धारण करणारानें ज्या सत्ताप्रकारानें एखादी जमीन किंवा गांव धारण केलें होतें तो सत्ताप्रकार नाहीसा होण्यापूर्वी कोणत्याहि वेळीं त्यानें धारण केलेल्या जमिनीसंबंधीं किंवा गांवासंबंधीं त्यानें ठेवलेलीं कागदपत्रें असा समजावा ;

(४) "विहित केलेले" या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमान्वयें केलेल्या नियमावरून विहित केलेले असा समजावा.

धारण करणारानें जमिनी-बाबतचीं कागदपत्रें राज्य सरकारच्या स्वाधीन करणें.

३. प्रत्येक धारण करणारानें, राज्य सरकार याबाबतींत राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून निर्दिष्ट करील अशा तारखेपासून दोन महिन्यांच्या आंत, त्याच्या ताब्यांत असलेलीं जमिनीबाबतचीं सर्व कागदपत्रें, विहित केलेल्या रीतीनें, कलेक्टरच्या किंवा राज्य सरकार याबाबतींत नेमील अशा अधिकाऱ्याच्या स्वाधीन करणें हें त्याचें कर्तव्य असेल ;

परंतु, कोणत्याहि धारण करणाऱ्याच्या बाबतींत, यथास्थिति कलेक्टर किंवा अधिकारी यांस, पुरेशा कारणांसाठीं, अशी मुदत दोन महिन्याहून अधिक नाहीं अशा आणखी मुदतीपर्यंत वाढविण्याचा अधिकार आहे.

झडत्या घेण्याचा अधिकार.

४. जर कलेक्टर किंवा कलम ३ अन्वयें नेमण्यांत आलेला अधिकारी यांस, कोणताहि धारण करणारा कलम ३ अनुसार आवश्यक असेल अशी जमिनीबाबतचीं कागदपत्रें स्वाधीन करण्याचा संभव नाहीं किंवा त्याचा नाश करण्याचा किंवा त्यांत ढवळाढवळ करण्याचा संभव आहे असें वाटण्यास कारण असेल, तर त्यास, अशीं कागदपत्रें परत मिळविण्याच्या कारणांकरितां झडतीसाठीं अधिपत्र काढण्याचा व त्याबाबतींत दंड प्रक्रिया संहिता, १८९८ च्या ७ व्या प्रकरणाच्या उपबंधान्वयें जे अधिकार फौजदारी न्यायाधिशास वैधरीतीनें अंमलात आणण्याचा अधिकार आहे असें सर्व अधिकार अंमलांत आणण्याचा अधिकार आहे.

अपराध व शिक्षा.

५. जर धारण करणारा, कलम ३ च्या उपबंधानुसार जमिनीबाबतचीं कागदपत्रें स्वाधीन करण्यांत कसूर करील तर त्यास, त्याजवर अपराध सिद्ध झाल्यानंतर, पराकाष्टा दोनशे रुपये दंडाची शिक्षा होईल. जमिनीबाबतचीं कागदपत्रें स्वाधीन करण्यांत कसूर करण्याचें चालूं ठेवल्याचें बाबतींत, अशा पहिल्या कसूरीबद्दल अपराध सिद्ध झाल्यानंतर, ज्या दिवशीं अशी कसूरी चालूं राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल धारण करणारास पराकाष्टा पंचवीस रुपये जादा दंडाची शिक्षा होईल.

नियम.

६. राज्य सरकारास, आगाऊ प्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन राहून, ह्या अधिनियमाचे हेतु पार पाडण्याच्या कारणांसाठीं नियम करण्याचा अधिकार आहे. असे नियम, ते अखेरचे करण्यांत येतील तेव्हां राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत.

## अनुसूचि

(कलम २ पहा.)

१. मुंबई तालुकदारी सत्ताप्रकार नाहीसा करण्याबाबत अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम ६२).

२. मुंबई परगणा व कुळकर्णी वतनें नाहीशीं करण्याबाबत अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम ६०).

३. मुंबई पटवा वजिफदारी हक्क नाहीसे करण्याबाबत अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम ६२).

४. साष्टी भू-संपत्ति (जमीन महसूल माफी नाहींशी करण्याबाबत) अधिनियम, १९५१ (सन १९५१ चा मुंबई अधिनियम ४७).

५. मुंबई जात इनामें नाहींशीं करण्याबाबत अधिनियम, १९५२ (सन १९५३ चा मुंबई अधिनियम ४२)

६. मुंबई विलीन क्षेत्रें (आंकडिया सत्ता प्रकार नाहींसा करण्याबाबत अधिनियम, १९५३ (सन १९५३ चा मुंबई अधिनियम ४३).

७. मुंबई कौली कटुबाण सत्ता प्रकार (नाहींसा करण्यांबाबत) अधिनियम, १९५३ (सन १९५३ चा मुंबई अधिनियम ४४).

८. मुंबई विलीन प्रदेश (बडोदा मूळगिरास सत्ताप्रकार नाहींसा करण्याबाबत) अधिनियम, १९५३ (सन १९५३ चा मुंबई अधिनियम ४५).

९. मुंबई विलीन प्रदेश (बडोदा वतन नाहींसा करण्याबाबत) अधिनियम, १९५३ (सन १९५३ चा मुंबई अधिनियम ४६).

१०. मुंबई विलीन प्रदेश मतादारी सत्ता प्रकार नाहींसा करण्याबाबत अधिनियम, १९५३ (सन १९५३ चा मुंबई अधिनियम ४८).